# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 15/12/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

### मोटारपंप चोरी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत दिग्रस बू. शिवार येथे फिर्यादी नामे— राजेन्द्र माधवराव मानकर, वय ४५ वर्षे रा. ठोमा लेआॅउट, पंचवटी काटोल ता. काटोल हे दि. ०४/१२/२०२३ रोजी ११/०० वा. दरम्यान आपले शेतात गेले व दुपारी १५/०० वा. काम करून घरी परत आले तेव्हा विहीरीमध्ये लावलेली मोटरपंप होती. दि. ०६/१२/२०२३ रोजी दुपारी १२/०० वा. फिर्यादी शेतात मोटारपंप सुरू करणे करीता गेले असता विहीरीवर लावलेली मोटरपंप दिसली नाही यावरून फिर्यादी यांनी आजुबाजुला शोध घेतला शोध लागला नाही. फिर्यादीचे ५ एच. पी हार्सपावरची मोटरपंप किंमती ४,०००/— रू. चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक विकास वाहीलकर पोलीस स्टेशन काटोल हे करीत आहे.

### विश्वासघात

**पो.स्टे. केळवद** :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा उमरी शिवार येथे दिनांक १०/१२/२०२३ चे १२.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— पुरूषोत्तम वामनरावजी आसोले, वय ४९ वर्ष, रा. उमरी ता. सावनेर जि. नागपुर हे नागपुर पांढुर्णा रोडच्या कडेला असलेल्या शेतात बैल चारत असता एका स्प्लेन्डर मोटरसायकलवर अनोळखी ०४ इसम तेथे आले व त्यांनी फिर्यादीस फोन लावण्याकरीता त्याचा मोबाईल मागीतला तेव्हा फिर्यादीने विश्वासाने त्यांना आपला मोबाईल रेडमी कंपणीचा किंमती १००००/— रू चा फोन लावण्याकरीता दिला असता अज्ञात ०४ इसम फोन फिर्यादीस परत न करता तेथुन पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे अज्ञात ०४ आरोपींविरुध्द कलम ४०६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपींचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार दिनेश काकडे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर